**श्री. मनोज पोपट चोभे, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), शिक्षण विभाग (प्राथ), जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-याची नेमणुक करणेबाबत ...**

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/२२६६६०१/२४४/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील दोषारोप पत्र क्र.साप्रवि-१/आस्था-३/२२६६६०१/८५८/२०२५ दिनांक २६/०८/२०२५
२. शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.अ.नगर यांचेकडील पत्र क्र.कार्या-२/आस्था-२/२/२६ दिनांक ०१/०१/२०२६ समवेत श्री चोभे यांचा दोषारोप पत्र बजावले बाबत पोहोच
३. इकडील पुरवणी दोषारोपपत्र क्र.साप्रवि-१/आस्था-३/२२६६६०१/१३२३/२०२५ दिनांक ०६/०१/२०२६
४. शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.अ.नगर यांचेकडील पत्र कार्या-२/आस्था-२/३०/२६ दिनांक १९/०१/२०२६ समवेत श्री चोभे यांचा दोषारोप पत्र बजावले बाबत पोहोच
५. इकडील निलंबन आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/२२६६६०१/१२५/२०२६ दिनांक ०९/०३/२०२६
६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

श्री. मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे शिक्षण विभाग (प्राथमिक) येथे कार्यरत असताना त्यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने श्री.चोभे यांना ज्ञापन/ दोषारोपपत्र बजावणेत आले. संदर्भ क्र. २ अन्वये श्री चोभे यांना ज्ञापन/ दोषारोपपत्र बजावले बाबत पोहोच कार्यालयास प्राप्त झाली. श्री. मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक (लि), यांनी अद्यापार्यंत ज्ञापन दोषारोपपत्राचा खुलासा सादर केलेला नाही. तसेच संदर्भ क्र.३ नुसार श्री.चोभे यांना पुरवणी दोषारोपपत्र संदर्भ क्र ४ नुसार बजावले बाबत पोहोच कार्यालयास प्राप्त झाली. श्री.मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक (लि), यांनी अद्यापार्यंत पुरवणी ज्ञापन दोषारोपपत्राचा खुलासा सादर केलेला नाही. संदर्भ क्र. ५ अन्वये श्री. मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबीत करणेत आले आहे.

सबब, श्री. मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.विजय सदाशिव औटी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी.

परिशिष्ट क्रमांक तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202604160400066 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-04-2026 16:15:22
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक. **सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते**

२. श्री.विजय सदाशिव औटी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथ) जि.प. अहिल्यानगर
**व्दारा व प्रत**- शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद अहिल्यानगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री.विजय सदाशिव औटी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.अहिल्यानगर, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.
**सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते**

३. श्री. मनोज पोपट चोभे, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत
व्दारा:- गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कर्जत
२/-सदर आदेशाची प्रत श्री. मनोज पोपट चोभे, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर